**L. C. BILL No. XIX OF 2026.**

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA COEP TECHNOLOGICAL UNIVERSITY ACT, 2022.

**सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १९.**

## महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.

**(विधानपरिषदेने दिनांक ७ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ यामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— (२०२२ चा महा. ३५.)

एचबी ८९२–१

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम १९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ (यात यापुढे ज्याचा निर्देश, “मुख्य अधिनियम” असा केला आहे) याच्या कलम १९ मध्ये, पोट-कलम (४) मधील खंड (च) मध्ये, “महाराष्ट्र विद्यापीठे लेखा संहितेनुसार” या मजकुराऐवजी, “महाराष्ट्र विद्यापीठे वित्त व लेखा संहितेनुसार” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

२०२२ चा महा. ३५.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ४३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४३ मध्ये, पोट-कलम (ढ) मधील, “कलम ६० च्या पोट-कलम (६)” या मजकुराऐवजी, “कलम ६० च्या पोट-कलम (६) व (७)” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ४४ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४४ मध्ये, पोट-कलम (९) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

“(१०) पूर्वगामी पोट-कलमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, विद्यापीठावर बंधनकारक असतील असे, एकरूप परिनियम विहित करण्याचा अधिकार असेल.”.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ५६ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५६ मध्ये, खंड (चार) मधील, “खरेदी व विक्री समिती” या मजकुराऐवजी, “खरेदी समिती” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ५९ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५९ मध्ये, पोट-कलम (५) मधील, खंड (ङ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईलः-

“(ङ) विद्यापीठाच्या कामांसाठी अनुभव सिद्ध व गुणवत्ता असलेले तीन ते पाच वास्तुविशारद आणि इतर विशेषीकृत सल्लागार, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार, संरचना सल्लागार, कार्यकारी अभिकरणे यांची एक नामिका तयार करील आणि त्यास नियमक मंडळाकडून मान्यता घेईल;”.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ६० ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६० मध्ये, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईलः-

“(१) विद्यापीठाच्या सर्व खरेदींशी संबंधित असणाऱ्या सर्व बाबी हाताळण्यासाठी एक खरेदी समिती असेल;”.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ७६ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७६ मध्ये, पोट-कलम (१) मधील, “लेखा संहितेचे” या मजकुराऐवजी, “महाराष्ट्र विद्यापीठे वित्त व लेखा संहितेचे” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

ɣ

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम,२०२२ ( २०२२ चा ३५ ) हा, संशोधन उद्योग समूह व निगम औद्योगिक संघ यांच्याशी सहयोग करण्याकरिता, उच्च वृद्धी असलेल्या क्षेत्रांमध्ये तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता ऊर्ध्व गतिशीलतेची तरतूद करण्याकरिता आणि लाभदायक रोजगार मिळण्याकरिता विद्यार्थ्यांना तयार करण्यासाठी, अध्यापन, अध्ययन, प्रशिक्षण, संशोधन, सल्ला, चाचणी व विस्तार यांच्या वैज्ञानिक व तंत्रज्ञान व्यवस्थापन व विकास संघटनेची तरतूद करण्याकरिता, उद्योगांच्या सहयोगाने उत्कृष्टता केंद्र, संशोधन पार्क स्थापन करण्यासाठी आणि नवीन शैक्षणिक धोरणामध्ये योजिलेली उद्दिष्टे अंमलात आणण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता एक विशेषीकृत तंत्रज्ञानात्मक एकात्म सार्वजनिक विद्यापीठ म्हणून सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ स्थापन करण्यासाठी व विधिसंस्थापित करण्यासाठी अधिनियमित केला आहे.

**२.** राज्यातील सर्व सार्वजनिक विद्यापीठांच्या लेखापरीक्षण कार्यपद्धतीमध्ये एकरूपता आणण्याच्या आणि विद्यापीठाच्या सुरळीत कामकाजासाठी एकरूप परिनियम विहित करण्याकरिता राज्य शासनास अधिकार प्रदान करण्याच्या आणि त्याच्या परिणाम स्वरूप सुधारणा करण्याच्या दृष्टीने, उक्त अधिनियमाची कलमे १९, ४३, ४४, ५६, ५९, ६० व ७६ यांमध्ये सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

**३.** वरील उद्दिष्टे साध्य करणे, हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ५ जुलै, २०२६.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेतः—

**खंड ४.—** या खंडान्वये, विद्यापीठावर बंधनकारक असतील असे एकरूप परिनियम विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वर नमूद केलेला प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचा आहे.

## सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १९ – महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२६ याचे परिशिष्ट.

## (महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ मधील उतारे)

## (सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५)

**१. ते १८.** *** *** *** ***

**१९.** (१) व (३) *** *** *** *** वित्त व लेखा अधिकारी आणि त्याचे अधिकार व कर्तव्ये.

(४) वित्त व लेखा अधिकारी,—

(क) ते (ङ) *** *** *** ***

(च) महाराष्ट्र लेखा संहितेनुसार खंड (क) ते (ङ) अन्वये कर्तव्ये पार पाडील;

(छ) ते (ण) *** *** *** ***

**२०. ते ४२.** *** *** *** ***

**४३.** या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून, परिनियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :— परिनियम व त्यांचे विषय.

(क) ते (ड) *** *** *** ***

(ढ) कलम ६० च्या पोट-कलम (६) अन्वये खरेदीसाठी अनुसरावयाची कार्यपद्धती;

(ण)*** *** *** ***

**४४. ते ५५.** *** *** *** ***

**५६.** या अधिनियमान्वये पुढील समित्या व परिषदा घटित करण्यात येतील :— परिषदा व समित्या.

(एक) ते (तीन) *** *** *** ***

(चार) खरेदी व विक्री समिती;

(पाच) ते (आठ) *** *** *** ***

**५७. ते ५८.** *** *** *** ***

**५९.** (१) व (४) *** *** *** *** इमारत व बांधकाम समिती.

(५) इमारत व बांधकाम समिती,—

(क) ते (घ) *** *** *** ***

(ङ) विद्यापीठाच्या कामांसाठी अनुभवसिद्ध व गुणवत्ता असलेल्या अशा तीन वास्तुविशारदांची आणि इतर विशेषीकृत सल्लागारांची एक नामिका तयार करील आणि त्यास नियामक मंडळाकडून मान्यता घेईल;

(च) ते (ढ) *** *** *** ***

(६) ते (८) *** *** *** ***

खरेदी समिती.

**६०.** (१) ज्यामध्ये प्रत्येक बाबीचे स्वतंत्र मूल्य, एका वेळी दहा लाखांहून अधिक असेल अशा बाबींच्या संबंधात; विद्यापीठाच्या सर्व खरेदीशी संबंधित असणाऱ्या सर्व बाबी हाताळण्यासाठी एक खरेदी समिती असेल.

(२) ते (८) *** *** *** ***

**६१.** ते **७५.** *** *** *** ***

वार्षिक लेखे व लेखापरीक्षा.

**७६.** (१) विद्यापीठाचे लेखे, दुबार नोंद लेखांकन पद्धतीच्या व तत्त्वांच्या आधारे ठेवण्यात येतील आणि अनुसरावयाची लेखांकन पद्धती, राज्य शासनाने विहित केलेल्या लेखा संहितेचे अनुपालन करणारी व्यापारी लेखांकन पद्धती असेल.

(२) ते (५) *** *** *** ***

**७७.** ते **८८.** *** *** *** ***

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १९.]**

**[महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम,
२०२२ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.**]**

**(विधानपरिषदेने दिनांक ७ जुलै, २०२६ रोजी
संमत केल्याप्रमाणे.)**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव (३),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.